Bhagwati
Page No.
Date: / /

Expt. No.......................... Page No..............

श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय,
अमरावती.

नाव : कु स्नेहा नंदकिशोर गावंडे
वर्ग : बी.एड II Sem IV
रोल.नं : 05

# विशेष शाळा भेट अहवाल

मार्गदर्शक - प्रा. डॉ. मीना रोकडे मॅडम

Teacher's Signature..............................





Expt. No.......................... Page No...............

# विशेष शाळा भेट
# अहवाल

शाळेचे नाव : डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय, अमरावती

संस्थेचे नाव : अंध कल्याण संघ, अमरावती.

स्थापना वर्ष : 25 जुलै 1966

संस्था अध्यक्ष : प्रविणभाऊ मालपाणी

मुख्याध्यापकाचे नाव : नवनाथ श्रीपतराव रंगोले.

Bhagwati
Page No.
Date: / /

Expt. No.......................... Page No..............

कर्मचारी संख्या : 32 कर्मचारी संख्या आहे.

शाळेची विद्यार्थी संख्या : 126 एकूण विद्यार्थी संख्या आहे.

शाळा स्थापनेचा उद्देश :

1) विशेष विद्यार्थ्यांची शिक्षण, पूर्नवसन, सर्वांगीण विकास साधणे

2) अंध विद्यार्थ्यांना योग, कला, क्रिडा इत्यादी क्षेत्रात शिक्षणं व प्रशिक्षण देणे.

3) अंधांच्या सांस्कृतिक विकास, शारीरिक विकास साधणे.

4) या विद्यार्थ्यांचा विकास घडवून त्यांना ~~स्वाव~~ स्वावलंबी बनविणे.

Teacher's Signature..........................


Bhagwati Page No. Date: / /

Expt. No.......................... Page No..............

समावेशक शाळा बांधणीचे मार्गदर्शक घटक :

- ही निवासी शाळा आहे. येथे अंध विद्यार्थीनी आणि विद्यार्थी साठी स्वतंत्र वसतीगृह आहेत
- वसतीगृहामध्ये सर्वांना स्वतंत्र बाकांची व्यवस्था पुरविण्यात आली आहे
- विद्यार्थ्यांच्या जेवनासाठी मोठा भोजनालय कक्ष आहे. एकत्र सर्व विद्यार्थी येथे वेळापत्रकानुसार नाश्ता भोजन करतात.
- त्याचबरोबर इतर सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी संगीतवर्ग, वाद्य, लिपी क्रिडा इत्यादींची व्यवस्था आहे.

Teacher's Signature..............................





- समावेशक शाळेतील भौतिक सुविधा / भौतिक गोष्टींचे व्यवस्थापन :

1) शाळेची इमारत व वर्गखोल्यांची रचना.

- शाळेची इमारत ही L आकाराची आहे.
- 12-12, 15-15 वर्गखोली संख्या आहे.
- मुलांची बसण्याची व्यवस्था V आकाराची आहे.
- शिक्षक विद्यार्थ्यांची आंतरक्रीया या आकाराच्या बैठक व्यवस्थेत योग्य पद्धतीने पार पडते.
- स्वतंत्र वर्गखोल्यांची व्यवस्था आहे आणि ही 'L' आकारामध्ये आहे.
- लहान मुलांसाठी गार्डन, जिम, PT चे साधन डंबेल, खेळाचे साहित्य इत्यादि सुविधा आहेत.








- सुविधांची उपलब्धता :-
- मुलांना संगीत, वाद्य, swimming इ. मोफत प्रशिक्षण दिले जाते.
- computer, software इ प्रशिक्षण साधने उपलब्ध आहे.
- विद्यार्थ्यांना शाळेचा गणवेश मोफत दिला जातो.
- विद्यार्थ्यांना रोज शाळेत भोजन दिले जाते. गुलाबजाम, शिरा ---- असे भोजन दिले जाते.
- मुलांना खेळण्यासाठी गार्डन आहे.
- वर्षातून एकदा विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल काढण्यात येते.
- राष्ट्रीय स्तरापर्यंत स्पर्धा परिक्षेमध्ये मुलांची नेण्या आणण्याची सोय मोफत केली जाते.









- शाळेमध्ये मुला-मुलींसाठी वसतीगृह आहे. वसतीगृहामध्ये वेगवेगळे modern आहेत.
- शाळेत चौकीदार आहे.
- मुलांना मोफत शैक्षणिक साहित्य दिले जाते.









- सामाजिक अंग (शाळेचे सामाजिक व्यवस्थापन) :

1) विद्यार्थी, शिक्षक, प्रशासक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे परस्पर संबंध :

शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये आपुलकीचे व चांगले संबंध आहेत. त्याचबरोबर विद्यार्थी, शिक्षक, प्रशासक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे परस्पर संबंध चांगल्या प्रकारचे आहे.

2) पालकांचा सहभाग -

दिवाळी मध्ये मेळावा घेतला जातो. शाळा समितीवर पालकांचा सहभाग घेतला जातो. व चौकशी केली जाते.

3) शाळेच्या निर्णय प्रक्रियेमध्ये शिक्षक विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा सहभाग घेतला जातो का?

होय, शाळेच्या निर्णय प्रक्रियेमध्ये शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांचा सहभाग घेतला जातो.






• शैक्षणिक अंगे किंवा अध्ययन अध्यापनाचे व्यवस्थापन :

1) सूचनेचा दर्जा :

सूचनेचा दर्जा उत्तम आहे. sms, पोस्टकार्ड यांद्वारे सूचना दिली जाते. बेलद्वारे सुद्धा विद्यार्थ्यांना सूचना दिली जाते.

2) विद्यार्थ्यांच्या प्राविण्याबद्दल किंवा यशस्वीते बद्दल शिक्षकांच्या अपेक्षा :

- विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेले आहे.
- शिक्षक प्रत्येकवेळी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील आहेत
- विद्यार्थी शिक्षकांच्या अपेक्षेवर खरे उतरतात.
- तसेच विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमामध्ये प्राविण्य प्राप्त करावे व प्रत्येक विद्यार्थी यशस्वी झाला पाहिजे असे शिक्षकांना वाटते.







Bhagwati
Page No.
Date: / /

Expt. No.......................... Page No..............

3) विद्यार्थ्यांच्या प्रगतीची देखरेख :

- प्रत्येक विद्यार्थ्याची स्वतःची प्रगती व्हावी याकरिता शिक्षक मार्गदर्शन करतात.
- शिक्षक प्रत्येकवेळी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील आहेत.

4) विद्यार्थ्यांसाठी वेळापत्रक दैनंदिनी :

- शाळेला दिनचर्या आहे.
- 11 ते 5.10 ही शाळेची वेळ आहे.
- शाळेमध्ये रोज प्रार्थना घेतली जाते. योगा पण घेतला जातो.
- विद्यार्थ्यांना रोज सकाळी 10 वा. जेवण, दुपारी 2 वा जेवण व संध्याकाळी जेवण देण्यात येते.
- विद्यार्थ्यांना रोज सकाळी दूध देण्यात येते.

Teacher's Signature....................








5) अध्यापन कसे केले जाते :

- State board, P.H.D कुठलाही वेगळा portion नाही आहे.
- सर्व portion सारखाच असते.
- परंतु या विद्यार्थ्यांना Hand to Hand शिकविण्यात येते.
- syllabus हा सगळ्यांना सारखाच असते.
- विद्यार्थ्यांना शालेय विषया बरोबर फाईल Binding, संगित, सून काढणे विक्रम इ. सुद्धा शिकविण्यात येते.

6) मूल्यमापनाचे व्यवस्थापन :

- अध्ययनकर्त्यांचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी त्याच्या प्रगतीचा आणि विशिष्ट उद्दिष्टे कीती प्रमाणात साध्य झाली. यासाठी मूल्यमापन योजना येथे राबविली जाते.
- मूल्यमापनाचे योग्य व्यवस्थापन शाळेत करण्यात आलेले आहे







आधुनिक काळात समावेशक शाळेची भूमिका :

- आधुनिक काळात या प्रकारच्या समावेशी शाळेची महत्वाची भूमिका आहे.

- आजचा प्रत्येक विद्यार्थी हा शिक्षणाच्या जोडीने प्रशिक्षीत होऊन कधी आपल्यामधील कौशल्याची जाणीव होऊन पुढे त्याच्या त्याचा विकास करण्यासाठी वाटचाल करेल हेच समावेशी शाळेची महत्वाची भूमिका राहिल. जणेकरुन विद्यार्थी हा स्वावलंबी बनेल.

- समावेशी शाळांना विविध संसाधने व विद्यार्थ्यांना उपयुक्त तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास त्यांचा अधिक विकास होईल.

- कोणत्याही प्रकारचे अपंगत्व असलेला विद्यार्थी हा शाळेत जाण्यापासून वंचित राहू नये ही आधुनिक काळातील अशा समावेशी शाळेची महत्वाची भूमिका आहे.


Page No.
Date / /

श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय,
अमरावती

श्वेता साहेबराव कुरळकर
बी.एड द्वितीय वर्ष
रोल नं. 12
डॉ. नरेंद्र भिवापूरकर
अंध विद्यालय अहवाल लेखन

मार्गदर्शक :
प्रा. डॉ. मीना रोकडे मॅडम

सत्र : 2019 - 2020



# विशेष शाळाभेट अहवाल

1) शाळेचे नाव : डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय, अमरावती

स्थापना वर्ष : 1966

मुख्याध्यापकाचे नाव : नवनाथ इंगोले

शिक्षकांची संख्या : 14

एकूण कर्मचारी संख्या : 32

विद्यार्थी संख्या :
मुली : 52 मुले : 126

शाळा स्थापना उद्देश :
अंध मुलांनी इतर मुलांप्रमाणे जगावे, स्वतः चे काम स्वतः करावे, ब्रेल लिपी शिकावी, स्वतःला कमजोर समजून नये हाच या शाळा स्थापनेचा उद्देश आहे. मुला-मुलींसाठी hostel ची सोय, 2 वेळ जेवण, 1 वेळ नाश्ता तसेच Music, PT इत्यादी सर्व मुलांना यावे यासाठी या शाळेची स्थापना करण्यात आली. आणि प्रार्थना, खेळ, खेळणे इ. सर्व या शाळेत घेतल्या जाते प्रत्येक वर्गाचे Period होतात, त्यांची






Page No.
Date / /

Test घेतल्या जाते. सर्व विषय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी शाळेत अंध शिक्षक आहेत. ते विद्यार्थ्यांना पूर्ण ज्ञान देण्याचा प्रयत्न करतात. हाच या शाळा स्थापनेचा मूळ उद्देश आहे.

2) **समावेशक शाळा बांधणीचे मार्गदर्शक घटक**

समावेशक शाळेतील भौतिक सुविधा, रचना


1. **शाळेची रचना :**

शाळेची रचना व्यवस्थित केलेली आहे. विद्यार्थ्यांना योग्य अशी त्यामुळे विद्यार्थी कुठल्याही काठीचा वापर न करता आपले काम करु शकतात. शाळेत पिण्याचे पाणी कुठे आहे, हे देखील विद्यार्थ्यांना माहित आहे. त्यांची रुम, जेवणाची व्यवस्था, वर्गखोल्या या सर्वांची रचना पद्धतशीर केलेली आहे. Library ची व्यवस्था केली आहे.

2. **इमारत, वर्गखोल्या रचना :**

शाळेची इमारत खूप मोठी आहे. या इमारतीत सर्व व्यवस्था केली आहे. वर्गखोल्या भरपूर आहेत. प्रत्येक वर्गासाठी वेगळी वर्गखोली





Page No.
Date / /

आहे त्यात वेगवेगळे section आहेत. वर्गखोलीत सूर्यप्रकाश येतो. हवा खेळती राहते. प्रसन्न वाटते. डेस्क-बेंच, [illegible], फॅन यांची व्यवस्था केलेली आहे. तसेच, विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप देखील केले जाते.

3. **शाळेचा आकार :**

शाळा 'L' आकाराची आहे. शाळेचे क्षेत्रफळ योग्य असे आहे

4. **शिक्षक विद्यार्थी प्रमाण :**

शिक्षक 14 आहेत तसेच एकूण कर्मचारी 32 आहेत. विद्यार्थी संख्या भरपूर आहे. मुली 52 आणि मुले 126 आहेत


5. **नियोजन :**

शाळेचे नियोजन व्यवस्थीत केले आहे. 2 वेळ जेवण दिल्या जाते सकाळी 10 वाजता आणि संध्याकाळी 6 वाजता. तसेच दुपारी नाश्ता दिला जातो. अशाप्रकारे विद्यार्थ्यांचे जेवणाचे नियोजन केले आहे. सकाळी दूध देतात.

6. **क्रीडांगण :**

शाळेचा परिसर खूप मोठा आहे. क्रीडांगण विद्यार्थ्यांना पुरेसे असे

Page No.
Date / /



Page No.
Date / /

आहे शाळेचे क्षेत्रफळ 14000 स्केअर फूट आहे. शाळेतील Library 133.48 चौ.मी. 17858 चौ.मी आहे.

7. **प्रशासन :**

शाळेत सर्वांचे प्रशासन चालते. पालक सभा घेतली जाते. शिक्षकांचा सहभाग असतो. विद्यार्थ्यांची मते विचारण्यात येते. कर्मचाऱ्यांचा सहभाग घेतला जातो. पालकांचे मत लक्षात घेतले जाते. विद्यार्थी सुट्टीमध्ये इच्छा असल्यास घरी जाऊ शकतात. अशाप्रकार, शाळेत निर्णय घेतला जातो.

3) **अध्ययन - अध्यापनाचे व्यवस्थापन / शैक्षणिक अंग :**

आपले मुल प्रत्येक परीक्षेत चांगल्या मार्काने पास व्हावे, हुशार बनावे अशी प्रत्येक पालकाची अपेक्षा आहे. शिक्षक-पालक सभा दिवाळीच्या आधी घेतली जाते. शाळेत विद्यार्थ्यांसाठी सुरक्षितता ठेवली जाते.

4) **आधुनिक काळात समावेशक शाळांची भूमिका :**

आजचे युग हे विज्ञानाचे युग आहे. या काळात विद्यार्थ्यांची अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुरळीत चालण्यासाठी



Page No.
Date / /

शैक्षणिक साधनांचा वापर केला जातो. शाळेतर्फे मोफत पुस्तके वाटप केल्या जाते. खिचडी देखील मधल्या सुट्टीत दिल्या जाते. आधुनिक काळात समावेशक शाळेत विद्यार्थ्यांकडून पूर्ण अभ्यास करून घेतल्या जावा, घरी अभ्यास करण्याचे काम पडू नये, हीच भूमिका शाळेने राबवावी.

5) <u>समावेशक शाळेतील आव्हाने</u> :

समावेशक शाळेत विद्यार्थ्यांना विविध आव्हानांना सामोरे जावे लागते. विविध परीक्षा, स्पर्धा, खेळ इ. सर्व अंध विद्यार्थी सोबत शिक्षण घेऊन ही आव्हाने स्वीकारतात.

विद्यार्थ्यांना PT ( कवायत ) देखील शिकविली जाते. ते सुद्धा त्या मुलांसमोर एक आव्हानच आहे.

6) <u>समावेशक शाळेतील शिक्षकांची भूमिका</u> :

समावेशक शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान द्यावे. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया मनोरंजक होण्यासाठी शैक्षणिक साधनांचा वापर करावा. जसे, एखादी वस्तू असल्यास ती विद्यार्थ्यांना हाताळण्यास देणे. शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना समान समजावे. कोणालाही कमी लेखू नये. विद्यार्थ्यांना त्यांच्या



वयानुसार शिक्षण द्यावे म्हणजेच त्यांची कुवत लक्षात घ्यावी. शिक्षकांनी लेखी परीक्षा तसेच तोंडी परीक्षा देखील घ्याव्या. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आपल्या पाल्याप्रमाणे समजावे.

अशाप्रकारे, समावेशक शाळेतील शिक्षकांची भूमिका असायला हवी.


7) <u>आपले मत, निष्कर्ष</u> :

अंध, अपंग मुले ही सामान्य बालकांप्रमाणेच असतात, त्यांना कधी कमी लेखू नये. या मुलांनी ठरवले, तर ती काहीही करू शकतात. कारण ती खूप हुशार असतात.

Page No:
Date: / /

श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय
अमरावती.
आश्विनी भुलेश्वर मेश्राम
बी.एड वर्ष २ रे
सत्र - ४ थे
विषय :- मंदबुद्धी मुलांच्या विशेष
शाळेचा अहवाल.
35





Page No:
Date: / /

## ४. समावेशक वर्गातील व्यवस्थापन

### (1) भौतिक गोष्टींचे व्यवस्थापन :

एकूण '३' वर्गखोल्या, '१' हॉल '१' प्रयोगशाळा, एक computer Lab, १ वर्ग ज्यामध्ये कौशल्य शिकविल्या जाते. व त्यांनी बनविलेल्या वस्तु विक्रि करण्यासाठी एक दुकान आहे. वर्गाची रचना चौकोनी आहे, वर्गात Bench आहे 'L' आकाराची आहेत. असामान्य बालकांना शिकविण्यासाठी '६' विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असतो. विद्यार्थ्यांना हात लागेल एवढ्या अंतरावर इथे राहून त्याला शिकवाव लागते. वर्गात विविध प्राण्यांचे, खेळण्यांचे, फुलांचे, फुलांचे चार्ट आहे. विविधरंगी बुक्स व ठोकळ्यांची खेळणी आहेत ते ठेवण्यासाठी कपाटे आहेत. रंगरांगोळी करण्यासाठी विविध रंगपेट्या, crayons ठेवले आहेत.

थोडक्यात त्यांच्या मानसिक विकासाला आवश्यक अनेक शैक्षणिक विकासाला आवश्यक रचना वर्गखोलीची आहे.







Page No:

Date: / /

५. आधुनिक काळात समावेशक शाळेची भूमिका -

जिवन जगण्याकरिता ज्याप्रमाणे मनुष्याच्या अंगी कौशल्ये असणे व त्याला विकसित करणे आवश्यक असते जेणे करून त्याचा विकास व्हावा.

अशाच्याप्रकारच्या कौशल्य विकासपर कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना जिवनात उपयोगी पडणाऱ्या कौशल्यावर सोयीचे प्रशिक्षण दिल्या जाते. व सोबतच त्यांच्या कौशल्यांच्या विकास दाखविण्यासाठी म्हणून त्यांच्या कलाकृतींचे सादरिकरण करून केलेल्या कलेला मूल्य प्राप्त करून देण्याकरिता प्रेक्षकांसमोर सादर केल्या जाते.

शाळेच्या वैशिष्ट्यांचा विचार केला तर शाळेतिल विद्यार्थ्यांने आपले जीवन जगत असतांना कौशल्यांना अनुसरून जगल्यास त्यांना सोयीचे जाईल. याकरिता म्हणून समावेशक शाळेची भूमिका प्रयत्न करित असते.



Page No:
Date: / /

## ९. समावेशक शाळेत शिक्षकाची भूमिका -

समावेशक शाळेत शिक्षकाची भूमिका क्षमताधिष्ठीत असायला पाहिजे म्हणजे त्यामध्ये निरिक्षण क्षमता, तज्ञ मार्गदर्शन, सहभागी नेता, सहभागी मित्र, तत्वचिंतन, मूल्यमापन करणारा व व्यक्तीमत्व विकास हा अभ्यासक्रमाचा केंद्रबिंदू आहे. तसेच शिक्षक हा कौशल्यविकास परिधान केलेला असावा.

कारण -

- या विद्यार्थ्यांसोबत वागतांना सहानुभूतीने वागावे चिडू नये.
- विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या आवडी - निवडीनुसार त्यांच्या अभिरुचीनुसार अध्ययन करावे.
- सहली, प्रकल्प याद्वारे प्रयत्न अनुभव देण्याचा प्रयत्न करावा.
- शाबासकी द्यावी, आत्मविश्वास वाढवावा.
- मुलांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक अपूर्णतेच्या स्थितीचा विचार करून त्यांच्या सोबत आपली वागणूक ठेवावी.
- तसेच ६ ते १८ वयोगटातील कोणतेही अपंग मूल शिक्षणाच्या मुलभूत हक्कापासून वंचित राहणार नाही याकडे लक्ष देऊन अध्ययन करावे.

आणि हेच सर्व वैशिष्ट्ये आम्हाला आम्ही भेट दिलेल्या 'आशादिप' शाळेमध्ये दिसली.





## १०. समारोप

आज दि ७ फेब्रुवारी २०१९ रोजी आम्ही सर्वांनी अभ्यासक्रमात समाविष्ट स्वाध्याया-नुसार 'विशेष मुलांच्या शाळेला भेट व तेथील माहिती' याकरिता म्हणून case study करिता आशादिप अपंग मुलांच्या शाळेत जावयाचे ठरविले.

त्याकरिता म्हणून आम्हाला कौ. मीना रोकडे मॅडमचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी पूर्वतयारीकरिता आधीच आम्हाला काही सूचना दिल्या तसेच permission letter तयार करून दिले.

ठरल्याप्रमाणे ठिक १.३० मि. ला आम्ही शाळेला भेट देण्याकरिता गेलोत. तेथील मुख्याध्यापक सिस्टर आशा फ्रान्सेस यांनी आम्हाला काही सूचना दिल्या त्याच सूचनेनुसार आम्ही शाळेतील सर्व घटकांना पाहु शकलो, समजू शकलो.

शाळेत एकूण ३-वर्गखोल्या, १-हॉल, १-प्रयोग-शाळा, १- computer lab, १- कौशल्य शिकवणी हॉल अशी भव्य इमारत आहे. त्यामध्ये शाळेच्या समोर मोठे ground आहे. त्यावर विद्यार्थी वेगवेगळी खेळ खेळत होती.

प्रशिक्षित शिक्षकांच्या मार्गदर्शनाने व

Expt. No.......................... Page No..............

श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती

सत्र :- 2019 - 20

बी. एड. :- द्वितीय वर्ष (Sem IV)

रोल नं :- 28

विषय :- विशेष शाळा भेट अहवाल

कु. सोनाली गं. ढोले




शाळेचे प्रवेशद्वार



मानसिक दृष्ट्या अकार्यक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी प्राप्त करुन देणे.

## प्रकरण - २. समावेशक शाळा बांधणीचे मार्गदर्शक घटक

* **समावेशक शाळेतील भौतिक सुविधा :-**

असीसी आराधीप मतिमंद मुलांची विशेष शाळा अमरावती येथे भेट दिली असता भौतिक सुविधा विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातुन योग्य प्रमाणात असल्याचे दिसून आले. शाळेचा परिसर लहान आहे. मुलांना येण्याजाण्याचा त्रास होवू नये म्हणून एका एका वर्गखोलीत अतिशय मर्यादित विद्यार्थी संख्या ठेवली आहे. त्यांचे बसण्याचे टेबल खुर्ची चे आकार विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातुन योग्य आहेत ~~वरिल~~ वरच्या मजल्यावर जाण्यासाठी पायऱ्यांची जी व्यवस्था आहे ती उत्तम तसेच सपाट पायऱ्या आहेत. पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था आहे. वर्गखोल्या अतिशय उत्तम प्रकारे रंगविल्या आहेत. चित्रे फळे, झाडे; खेळण्याची साधने, वस्तू आहेत.




विद्यार्थ्यांची टि.व्ही. पाहण्याची वर्गखोली

Bhagwati
Page No.
Date: 3 /

Expt. No.......................... Page No..............

अ) शाळेची रचना :-

शाळेची रचना हि विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातुन तयार केलेली आहे. विद्यार्थ्यांचा विचार करुनच संपुर्ण शाळेची इमारत आहे.


1) शाळेची इमारत व वर्गखोल्यांची रचना :-

शाळेची इमारत हि विद्यार्थ्यांच्या सोईनुसार बांधण्यात आली आहे. शाळेतील पायऱ्या सुध्दा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने बांधण्यात आल्या. शाळेचा परिसर सुध्दा व्यवस्थीत आहे. संपुर्ण परिसर स्वच्छ आहे. विद्यार्थ्यांच्या बुध्दीगुणांकानुसार वर्गखोल्या बांधल्या आहेत. वर्गखोल्या अतिशय रंग चित्रांनी छान रंगविल्या आहेत. शाळेची इमारत L आकाराची आहे. शाळेतील एकुण वर्गखोल्यांची संख्या 11 असुन संपुर्ण वर्गखोल्या चौरसाकृती आकाराच्या आहेत.

Teacher's Signature..............................



विद्यार्थी व्यायाम करतांना



विद्यार्थ्यांसाठी जीमची व्यवस्था



2) शाळेचा आकार :-


शाळेचा आकार हा एल स्वरूपाचा आहे. शाळेचा आकार अतिशय सुंदर आहे.

3) शिक्षक विद्यार्थी प्रमाण :-

शाळेमध्ये शिक्षकांचे प्रमाण (कर्मचारी) 25 आहेत त्यामध्ये 10 शिक्षक स्थायी स्वरूपात कार्यरत आहेत. एकुण विद्यार्थ्यांचे प्रमाण 120 असुन त्यामधील 70 विद्यार्थी हे वय वर्षे 18 च्या आतील आहेत.

4) वर्गखोल्यांचा क्रम :-

आशादीप मतिमंद विशेष शाळा येथे विद्यार्थ्यांच्या बुद्धी गुणांकानुसार चार प्रवर्ग केले आहे. शाळेची इमारत ही दुमजली आहे. खालच्या मजल्यापासुन वर्गखोल्यांचा क्रम 1, 2, 3 असा आहे. दुसऱ्या मजल्यावर देखील उजवीकडे 4, 5, 6 असा क्रम आहे. आणि आणि दुसरीकडे इतर वर्गखोल्यांचा क्रम आहे.



पिण्याच्या पाण्याची सोय



विद्यार्थ्यांना खेळण्याची सुविधा



5) नियोजन आणि मांडणी :-

विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणे त्यांच्या शिकविण्याचे व्यवस्थित-रित्या नियोजन केले जाते. त्यांच्या बौद्धीक पात्रतेनुसार त्यांना शिक्षण दिले जाते. शाळेच्या मुख्याध्यापकांच्या सहाय्याने शाळेतील संपुर्ण नियोजन लावल्या जाते. शाळेचा संपुर्ण व्यवहार नियोजनानुसार चालतात आणि उद्दीष्टांची योग्य पद्धतीने मांडणी करुन त्यांचे नियोजन चालते.

6) सुविधांची उपलब्धता :-

मतिमंद विद्यार्थ्यांच्या ज्ञानपातळीनुसार वर्गखोल्यांची रचना केलेली आहे. विद्यार्थ्यांना अक्षर ज्ञान बऱ्याच विद्यार्थ्यांना नसल्याने त्यांना चित्रा-द्वारे किंवा वस्तुंद्वारे शिक्षण देण्यासाठी वर्गामध्ये चित्रे काढलेली आहे. नवनवीन गोष्टी, कविता दाखविण्यासाठी ऐकविण्यासाठी T.V. ची उपलब्धता देखील आहे. त्यांना कम्प्यूटरचे ज्ञान देण्यासाठी कम्प्यूटर लॅब, काही vocational courses



विद्यार्थी कलाकृती करतांना



विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तु

Bhagwati
Page No.
Date: 7 / /

Expt. No.......................... Page No..............

आहेत, योगा करण्यासाठी जीमची व्यवस्था आहे.

विद्यार्थ्यांसाठी शाळेत येजा करण्यासाठी बसची व्यवस्था केली आहे. बसमधील बसण्याची व्यवस्था हि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त होती.

या मतिमंद मुलांसाठी मैदानाची सुद्धा व्यवस्था आहे. मैदानामध्ये मतिमंद विद्यार्थ्यांना विचारात घेवून खेळण्याची व्यवस्था केलेली होती. खेळण्याची व्यवस्था सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य होती.

विद्यार्थ्यांसाठी आवश्यक तेवढ्या वर्गखोल्या होत्या. जीमची व्यवस्था असून त्या खोलीत व्यायामाचे सर्व मशीन होत्या. मनोरंजनासाठी टि.व्ही ची वगैरे व्यवस्था होती.

Teacher's Signature..........................




विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना मी स्वतः (सोनाली ढोले)

Page No. Date: 8 /

Expt. No.......................... Page No..............

## ग) सामाजिक अंग / सामाजिक व्यवस्थापन

### 1) विद्यार्थी, शिक्षक, प्रशासक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे परस्पर संबंध :

आशादीप मतिमंद मुलांची विशेष शाळा येथे विद्यार्थी व शिक्षकांचे अतिशय प्रेमाचे नाते आहे. त्यांच्यात अतिशय जवळीकता आहे. येथील शिक्षक विद्यार्थ्यांशी खूप प्रेमाने आपुलकीने वागतात. तसेच प्रशासक, व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सुद्धा परस्पर संबंध आपुलकीचे सलोख्याचे आहे. परस्पर संबंध प्रामाणिकपणाचे आहे. शाळेत विद्यार्थी, शिक्षक, प्रशासक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांना विचारात घेवूनच सर्व कार्य होते.

### 2) पालकांचा सहभाग :-

आशादीप मतिमंद मुलांची विशेष शाळा येथे शाळेच्या कुठल्याही निर्णयात, कार्यात पालकांचा सहभाग असतो. वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या पालक सभेत संपुर्ण पालकांच्या

Teacher's Signature..............................




विद्यार्थ्यांची माहिती विचारतांना छात्राध्यापिका मी स्वत:



उस्फूर्त सहभाग असतो. किंवा विद्यार्थ्यांना लागणाऱ्या सोई सुविधा देण्यासाठी पालकांचा नेहमीच सहभाग होता.


3) शाळेच्या निर्णय प्रक्रियेत शिक्षक विद्यार्थी इतर कर्मचाऱ्यांच्या सहभाग घेतला जातो का?

आशादीप मतिमंद मुलांची शाळा येथे शाळेसंबंधीत कुठलाही निर्णय घेत असतांना शिक्षक विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या सहभाग घेतला जातो सर्वांसोबत चर्चा करून, विचार करून निर्णय घेतल्या जातो.

4) अध्ययन अध्यापनाच्या व्यवस्थापन

1) विद्यार्थ्यांना सूचनेचा प्रकार :-

विद्यार्थ्यांना सूचना देतांना त्या लिखित स्वरुपात दिल्या जाते. या मतिमंद मुलांना कुठल्याही प्रकारच्या सूचना देतांना त्या लिहून दिल्या जातात. प्रत्येक विद्यार्थ्यांना कागदावर सूचना लिहून दिल्या जातात.




विद्यार्थ्यांशी चर्चा



Expt. No.......................... Page No..............

2) विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेबद्दल प्राविण्याबाबत शिक्षकांच्या अपेक्षा :-

आशादीप मतिमंद शाळेतील शिक्षकांना विचारले कि तुमच्या विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेबद्दल प्राविण्याबाबत कोणत्या अपेक्षा आहेत ? तर तेथील शिक्षक म्हणाले कि आम्ही जे विद्यार्थ्यांना शिकवितो त्यांनी त्याचा सराव वारंवार करावा, अभ्यासक्रमात त्यांची प्रगती व्हावी. सर्वसाधारण मुलाप्रमाणे त्यांनी सुद्धा जीवनात स्वावलंबी होवून यश प्राप्त करावे. विद्यार्थ्यांनी जीवनात स्वतःसाठी भरपूर प्राविण्य, प्रसिद्धी, प्रगती मिळवावी अशा अपेक्षा तेथील शिक्षकांच्या होत्या.

3) विद्यार्थ्यांच्या प्रगतीची देखरेख :-

आशादीप मतिमंद शाळेत विद्यार्थ्यांना जे शिकविले जाते त्याची दर तीन महिन्यानंतर त्यांची परीक्षा घेवून किती प्रमाणात बदल झाला याची पाहणी केली जाते.




मुलींची कलाकृती करण्याची विशेष खोली



7) शालेय सुरक्षितता :-

मतिमंद विद्यार्थ्यांच्या दृष्टीने शाळेत सुरक्षितता आहे. जागोजागी सी.सी. टि.व्ही कॅमेरे आहेत. विद्यार्थ्यांना सांभाळण्यासाठी भरपूर शिक्षक आहेत. दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठीच्या पायऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने योग्य आहे. विद्यार्थ्यांना लक्षात घेवून खेळण्याची व्यवस्था आहे. शिक्षक कर्मचारी संख्या पुरेशी आहे.

8) आधुनिक काळात समावेशक शाळेची भूमिका

आधुनिक काळात समावेशक शाळेचे अनन्यसाधारण महत्व आहे. समावेशक शाळेत विशेष मुलांना विशेष प्रकारचे शिक्षण देवून अशा विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्याचे कार्य हि शाळा करते. अशा विद्यार्थ्यांना जीवनात उपयोगी येणारी कौशल्ये शिकवून त्यांनी तयार केलेल्या कलाकृतीचे प्रदर्शन करून त्यांच्यासाठी उदरनिर्वाहाची सोय केली जाते.




शाळेतील शिक्षक माहिती सांगताना



काम करत असतो. पण समावेशक वर्गात या भूमिकांशिवाय वेगळ्या भूमिका त्याला पार पाडाव्या लागतात. प्रामुख्याने विशेष गरजा असलेल्या बालकाला समजून घेणे, त्याच्या क्षमतेप्रमाणे विकासाच्या त्याला संधी देणे, त्याच्यातील सुक्ष्म गुणांना वाव देऊन त्याला सृजनात्मक बनविणे, त्यासाठी पालकांचे सहकार्य घेणे, समाजातील इतर घटकांना या बालकाच्या विकासाचाही सामावून घेणे या भूमिका समावेशक वर्गात प्राधान्याने पार पाडाव्या लागतात. त्यामुळे समावेशक शिक्षणात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे.

10) विद्यार्थी शिक्षकाचे स्वमत (निष्कर्ष)

समावेशक शिक्षण म्हणजे शिक्षण प्रवाहात सर्वांचा समावेश. खर तर अतिशय महत्त्व आहे या समावेशक शाळांची कारण यामुळे समाजातील काही असे मुले जी अध्ययन अक्षम आहेत, काही शारीरिक अपंग आहेत अशा मुलांना शिक्षण दिले जाते.



विद्यार्थ्यांशी संवाद

Bhagwati
Page No.
Date 15 /

Expt. No........................... Page No..............

आम्ही जेव्हा अचीसी आशादीप मतिमंद मुलांची विशेष शाळा येथे भेट दिली तेव्हा जाणवले कि खरंच हि विशेष मुले किती आनंदाने आणि उत्साहाने जीवन जगत आहेत. त्या मुलांमध्ये कुठल्याही प्रकारचे एकमेकांप्रती न्यूनभाव, भेदभाव नाहित. ती मुले तर आपल्याच विश्वात हरवली आहेत. त्या शाळेत असे बरेच विद्यार्थी दिसून आले ज्याच्या अंगी काही कलागुण आहेत कुणी खेळण्यात पुढे तर कुणी कलाकृती करण्यात काहींना चित्रे काढण्यात आनंद तर काही चित्रे रंगवण्यात समाजातील अश्या वंचाच्य मुलांना स्वावलंबी बनविण्याचे कार्य त्या शाळा करतात.

शाळेतील एक वेगळ्याच प्रकारचे जीवनानुभव आम्हाला त्या शाळेतून मिळाले. खर तर जीवनाला अजून चांगल्या-प्रकारे कसे जगता येईल याचे ह जीवंत उदाहरणे पहायला मिळाली. त्या विद्यार्थ्यांना बघून आम्हाला जणू एक वेगळीच प्रेरणा मिळाली. खर तर खुप आनंद झाला या विद्यार्थ्यांना भेटून.

Teacher's Signature..............................

★★★ **INDEX** ★★★

| S.No. | Name of Experiment | Date | Page | Remarks |
|---|---|---|---|---|
| | | | | |

Practical

Page No :
Date : \ \

# श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय,
# अमरावती

## विशेष शाळाभेट अहवाल
## बी. एड द्वितीय वर्ष
## भाग ४ सत्र २०२१-२२

छात्राध्यापिकाचे नाव
कु. निकिता रामहरीजी लवणकर

मार्गदर्शिका
प्रा. डॉ. मीना शेकडे मॅडम.

हजेरी क्र. 36

Teacher's Signature


कर्मशाळा



डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्याल



Name of Practical

**शाळेचे नाव :-**

"नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय, अमरावती."

**संस्थेचे नाव :-**

अंध कल्याण संघ, अमरावती
"The blind welfare association, Amravati

**स्थापना वर्ष :-**

नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय, अमरावती ची स्थापना 25 जुलै 1966 मध्ये झाली.

**संस्था अध्यक्ष :-**


डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालयाचे संस्था अध्यक्ष श्री प्रविण मालपानी आहेत.

**माहिती अधिकारी :-**

श्री. एन. एस. इंगोले हे माहिती अधिकारी आहेत.

**कर्मचारी संख्या**

शाळेत एकूण 27 कर्मचारी आहेत. त्यात एकूण 10 शिक्षक आहेत व





ne of Practical

व्यवस्था अशाप्रकारची आहे जेणेकरुन शिक्षकांचे बोलणे विद्यार्थ्यांला नीट ऐकू येईल. मुलांना बसण्यासाठी टेबल - खुर्ची अशी व्यवस्था केलेली आहे.

3> खेळाचे मैदान / जीम :-

विद्यालयामध्ये मुलांना समोरच खेळाचे मैदान आहे. विविध खेळांचे आयोजन मुलांसाठी केले जाते. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी आवाजाचे चेंडू तसेच विशेष बॅट उपलब्ध आहेत. याच्याबरोबर बुद्धिबळपट, ब्रेल पत्ते तसेच बोलके घड्याळ शाळेत आहेत.


विद्यालयामध्ये जीम देखील आहे.

4> वाचनालय :-

शाळेमध्ये सुसज्ज असे वाचनालय आहेत. वाचनालयात एकूण 500-700 पुस्तके उपलब्ध आहेत. आणि ती सर्व ब्रेल लिपीमध्ये आहेत.

5> शै. साहित्य :-

प्रत्येक अंध मुलाला वर्गामध्ये ब्रेल पाटी, ब्रेल पुस्तके याचा



विद्यालयातील खानावळ



of Practical

संच दिला जातो. तसेच घरी अभ्यासना- साठी त्यांना वेगळा संच देण्यात येतो.


## समावेशक वर्गातील व्यवस्थापन :-

### भौतिक गोष्टीचे व्यवस्थापन :-


नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय, अमरावती येथील शाळेत भौतिक गोष्टींचे व्यवस्थापन अतिशय योग्य पद्धतीने केलेले आहे. यामध्ये वर्गरचना आणि वर्गव्यवस्थापन या गोष्टींचा समावेश होतो. महाविद्यालयात बैठक व्यवस्था, वर्गखोलीची दारे, फळ्यावरील प्रकाशयोजना, वर्गातील विद्युत व्यवस्था, शैक्षणिक साहित्याचा आकार या सर्व गोष्टीचा विचार केला गेलेला आहे. अंध विद्यार्थ्यांना सहजगत्या इकडून तिकडे जाता यावे यासाठी योग्य बैठक व्यवस्था वर्गात केलेली आहे.

वर्गाला उंबरठे नाहीत तसेच वर्गातील जागेत चढ उतार नाहीत. मुलांना सहज इकडून-तिकडे जाता यावे यासाठी रस्त्याकडे कोणतेही अडथळे नाहीत. श्रवणयंत्र चष्मे यांचे पर्यायी

Teacher's Signature




## ब्रेल लिपी





संच वर्गात उपलब्ध आहेत. यावरूनच असे म्हणता येईल की, भौतिक व्यवस्थापनात अध्ययन - अध्यापनासाठी आवश्यक साधनांची योग्य अशी जुळवा-जुळव विद्यालयात केलेली आहे.


### अध्ययन - अध्यापनाचे व्यवस्थापन :-

अध्ययन - अध्यापनाच्या उत्तम व्यवस्थापनावरच विद्यार्थ्यांची प्रगती अवलंबून असते म्हणूनच विद्यालयात अनुदेशन कार्यनिती वापरल्या जातात.

सामान्य शाळांप्रमाणेच विद्यालयातील तासिकांचे नियोजन केलेले आहे. अध्यापनाच्या दृष्टीने तासिका ही ३५ मिनीटांची असते. ३५ मिनीटांच्या तासिकांचा मिळून Time table तयार केलेला असतो.

ब्रेल लेखनासाठी लेखनपाटी, गणित पाटी, ड्राइंग पेपर इतका जाड ब्रेल पेपर हे साहित्य पुरविले जाते.

# ध्वनी फीत






of Practical

ब्रेल पुस्तके, ब्रेल टाईपरायटर, ब्रेल तक्ते हे सहज विद्यार्थ्यांच्या हाती लागतील असे ठेवले जातात.

सम गणित, विज्ञान, भूगोल अशा विषयासाठी उठावाची साधने ठेवली जातात.

आणि तासिकेमध्ये प्रत्येक शिक्षक हा त्याच्या कृतीचे शाब्दिक वर्णन करून शिकवतो जेणेकरून अंध विद्यार्थ्यांना ते आकलन होण्यास मदत होते.

## मुल्यमापनाचे व्यवस्थापन :-

शिक्षकाने विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करून प्रत्येकाच्या गुणदोषांची जाणीव करून देणे आवश्यक असते. प्रत्येकाच्या विशेष क्षमतेनुसार मुल्यमापन करणे गरजेचे आहे. म्हणूनच विद्यालयात कोणत्या विद्यार्थ्यांचे कसे मुल्यमापन करायचे याचे नियोजन शिक्षक आधीच करतात. मुल्यमापनाच्या हेतु दोष दाखविणे हा नसतो. मुल्यमापन हे सृजनशील असते.

## महाविद्यालया बद्दल माहिती देतांना श्री चौधरी सर





दिशादर्शक, प्रोत्साहन देणारे व अध्ययनाला चालना देण्यासाठी केले जाते.

विद्यालयातील मुलांची Periodical test घेण्यात येते.
त्यासाठी प्रश्नपत्रिका ही ब्रेल लिपीमध्ये उपलब्ध करून देण्यात येते.
गरज असल्यास त्यांना लेखनिक (writer) पण उपलब्ध करून देण्यात येतो.

### आधुनिक काळात समावेशक शाळेची भूमिका :-

1)

शालेय प्रवाहापासून अद्यापही काही विशेष बालके दूर असलेली दिसून येतात. या बालकांचे पालक अज्ञानी, अशिक्षीत असल्याने ते आपल्या पाल्याला घराबाहेर पडू देत नाहीत. अशा बालकांचा शोध घेणे व पालकांचे समुपदेशन करून या बालकांना शाळेमध्ये दाखल करून घेणे

# पारितोषिक





हे कार्य सध्या शाळेने करणे गरजेचे आहे.


## २) विविध विभागांशी समन्वयाची भूमिका :

समावेशित शाळेच्या गुणवत्तापूर्ण विकासासाठी या शाळेमध्ये विविध घटकांशी समन्वय साधला पाहिजे. स्वंयसेवी संस्था, विशेष शिक्षण, आरोग्य विभाग, पालक, उद्योग, शासकीय अधिकारी यांच्याशी समन्वय ठेवल्यास शाळेच्या समस्या दुर होण्यास मदत होईल.

## ३) तंत्रज्ञानाचा वापर :

सध्याच्या युगात ज्ञान मिळविण्याचे प्रभावी माध्यम म्हणून तंत्रज्ञानाकडे पाहिले जाते. विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या अध्ययनासाठी तर याची अधिकच गरज असते. उदा. अंध मुलांसाठी बोलका संगणक. याप्रमाणे तंत्रज्ञानातील वैविध्यपूर्ण बदलांचा वापर समावेशित शाळेने करणे गरजेचे आहे.

of Practical





4) शिक्षकांचे प्रशिक्षण :-

समावेशित शाळेमध्ये अध्यापन करणे हे आव्हानात्मक कार्य आहे. या शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या अध्यापनासाठी आवश्यक कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रशिक्षणाची गरज असते. अशा प्रशिक्षणाचे आयोजन शाळेने केले पाहिजे.

5) प्रभावी नेतृत्व :-

समावेशित शाळेचे नेतृत्व करणारे मुख्याध्यापक हे नाविन्याचा स्वीकार करणारे, आपल्या शिक्षकांना प्रेरणा देणारे, त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी तत्पर असणारे असले पाहिजेत.

6) विशेष बालकांच्या वैयक्तिक नोंदी :-

समावेशित शाळेने विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या वैयक्तिक नोंदीवर भर दिला पाहिजे, यासाठी पडताळा सूची, निरीक्षण सूची इ. साधनांचा वापर करता येईल. या साधनांमुळे या बालकांच्या

Teacher's Signature

# स्व रोजगार प्रशिक्षण







अध्ययन समस्या समजतील.

**७) लोकशाही तत्वाच्या अवलंब :-**

समावेशित शाळेतील वातावरण लोकशाहीवादी असले पाहिजे व शालेय प्रशासनात सर्व मानवी घटकांच्या समावेश केला पाहिजे.

**८) शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी**

समावेशित शाळेने शिक्षण हक्क कायद्याची काटेकोर अंमलबजावणी केली पाहिजे. या कायद्यानुसार प्रत्येक बालकांना शिक्षणाच्या अधिकार आहे. त्यासाठी शाळेने सर्व मुल्यांच्या शिक्षणावर भर दिला पाहिजे.

सध्याच्या परिस्थीतीत शिक्षण व्यवस्थेत आमुलाग्र बदलानुसार समावेशित शाळेनेही बदल करणे गरजेचे आहे. या बदलाच्या स्वीकार करून अध्ययन प्रक्रिया गुणवत्तापूर्ण करण्यावर भर दिला पाहिजे.

# विद्यालयातील विद्यार्थिनी



Name of Practical

उपमा, पोहे दिले जाते. त्याचबरोबर जेवणामध्ये वरण, भात, भाजी, पोळी सणाला काही गोड दिले जाते. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी येथे घेतल्या जाते.

आपण पाहतो सध्या अनेक ठिकाणी पैशाचा अपव्यय होतो परंतु आता शाळेत मुलांना समावेशक शिक्षक मिळत असल्याने मुले आपला वाढदिवस ह्या अंध मुलांसोबत साजरा करतात व आपल्या आनंदात ह्या मुलांना सहभागी करून घेतात. त्यामुळे मुलांना समावेशक शिक्षण लहानपणापासूनच मिळाल्याने त्यांच्यामध्ये आपुलकीची व प्रेमाची, मदतीची भावना निर्माण होते.